RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १७०] शुक्रवार, नोव्हेंबर २८, २०२५/अग्रहायण ७, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४३४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २० नोव्हेंबर,२०२५.

**आदेश**

**महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९.**

क्रमांक एमपीआयडी ०३२४/प्र.क्र.२२/पोल-१५.—ज्याअर्थी, जुही मॅरिटाईम कार्गो आणि लॉजिस्टिक सर्विसेस, नोंदणी क्र. १६१०२००३१०३०५१८५, नोदंणीकृत पत्ता फ्लॅट नं ३, प्लॉट नं. ४२३/४२४, सेक्टर-१, घणसोली, नवी मुंबई, ठाणे ४०० ७०१ कार्यालयीन पत्ता :- ऑफिस नं. ६१७, अरेजा कॉर्नर, सहावा माळा, प्लॉट नं. ७१, से.नं. १७, वाशी, नवी मुंबई (यापुढे " उक्त वित्तीय संस्था " असा निर्देश करण्यात आला आहे) आणि संस्थेचे संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार आणि कर्मचारी यांनी ठेवीदारांना मुदतीअंती लाभासह ठेवी परत करण्याचे आश्वासित करून ठेवी स्विकारल्या होत्या ;

आणि ज्याअर्थी, उक्त वित्तीय संस्था आणि सदर संस्थेचे संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार आणि कर्मचारी यांनी ठेवीदारांकडून स्वीकारलेल्या ठेवी मुदतपूर्तीनंतर ठेवीदारांना परत करण्यास कसूर केला असल्याने त्यांचेविरुध्द वाशी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. ११९/२०२०,नुसार भारतीय दंड संहिता(सन १८६० चा ४५) कलम ४०६, ४०९, ४२०, ५०६ आणि १२०-बी सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (२००० चा महा. १६) कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, उक्त वित्तीय संस्था आणि सदर संस्थेचे संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार आणि कर्मचारी हे ठेवीदारांनी मागणी केल्यानुसार ठेवी परत करण्यात अपयशी ठरले असून उक्त वित्तीय संस्थाद्वारे ठेवीदारांना ठेवी परत करण्याची शक्यता दिसून येत नाही ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाला, जुही मॅरिटाईम कार्गो आणि लॉजिस्टिक सर्विसेस आणि संस्थेचे संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार आणि कर्मचारी यांनी जमा केलेल्या ठेवींमधून त्यांच्या स्वतःच्या अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावे रक्कम व अन्य मालमत्ता संपादित करण्यात आली असल्याचे अभिकथित असल्याने, उक्त वित्तीय संस्थांमधील ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्याकरिता अशी रक्कम व अन्य मालमत्ता जप्त करण्याचे आणि अशा जप्त रक्कम व अन्य मालमत्ता यावर नियंत्रण ठेवण्याकरिता उपविभागीय दंडाधिकारी ठाणे, जिल्हा ठाणे यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक वाटते.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (२००० चा महा. १६) च्या कलम ४ चे पोट-कलम (१) व कलम ५ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे —

(अ) अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे,उक्त वित्तीय संस्था आणि सदर वित्तीय संस्थेचे संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार आणि कर्मचारी आणि कोणतीही अन्य व्यक्ती यांच्या नावे असलेली रक्कम व अन्य मालमत्ता जप्त करीत आहे, आणि

(ब) सदर जप्त केलेल्या रक्कम व अन्य मालमत्ता यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी ठाणे, जिल्हा ठाणे यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

## अनुसूची

जुही मॅरिटाईम कार्गो आणि लॉजिस्टिक सर्विसेस या संस्थांचे संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार आणि कर्मचारी आणि कोणतीही अन्य व्यक्ती यांच्या जप्त करावयाच्या रक्कम व अन्य मालमत्तेची सूची खालीलप्रमाणे आहे :–

**(अ) स्थावर मालमत्ता तपशील :-**

| अ. क्र. | गाव / तालुका/ जिल्हा | मालमत्तेचे वर्णन | मालमत्ता धारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | वाशी, नवी मुंबई | सर्व्हे क्र. ५/१४८, सदनिका क्र. ए/३, तळमजला, बिल्डींग नं. ३, नूर सोसायटी, प्लॉट नं. १८, से.नं. ९ ए, क्षेत्र-६०.८५ चौरस मिटर दस्त क्रमांक -टनन ३/ १२२९२/२०१८ दिनांक- ०१/०९/२०१८ | १) तलाह शफी मुरशदकर,<br>२) मुनज्जा तलाह मुरशदकर,<br>३) इशाक अकबर हवेलीवाला. |
| २. | वाशी, नवी मुंबई | सर्व्हे क्र. ५/१९७, ऑफिस क्र. ११०३, ११ वा. मजला, नॅचरल गम प्रिमायसेस सोसायटी, प्लॉट नं. २, सेक्टर १९ डी, क्षेत्र.-७८.९२९८ चौरस मिटर दस्त क्रमांक-टनन ८/ ३८३१/२०१८ दिनांक- ३१/०३/२०१८ | १) तलाह शफी मुरशदकर,<br>२) विजय नारायण कणसे,<br>३) शेख अदिल अब्दुल गणी,<br>४) शेख सफिया अदिल,<br>५) शेख मोहम्मद सिध्दिकी. |
| ३. | मालेगाव, नाशिक | सर्व्हे नं. ८५/२, प्लॉट नं. २६,२७, सना इनक्ल्यु पार्ट ३, तळमजला, युनिट १ क्षेत्र- ६०.२२ चौरस मिटर दस्त क्रमांक-टनन-३/३१४०/२०१९ दिनांक-०६/०७/२०१९ | १) मोहम्मद रिजवान मोहम्मद शाकोर कुरेशी,<br>२) शकिना बानो मोहम्मद रिजवान कुरेशी. |

**(ब) बँक खात्यांचा तपशील :—**

| अ. क्र. | खातेदाराचे नाव | बँकेचे नाव | खाते क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | जुही मॅरिटाईम कार्गो आणि लॉजिस्टीक सर्व्हिसेस | आय.सी.आय.सी.आय बँक, वाशी | ०१५१०५०१३५७२ |
| २. | जुही मॅरिटाईम कार्गो आणि लॉजिस्टीक सर्व्हिसेस | येस बँक, वाशी | ००६२६१९०००४०३२ |
| ३. | शेख मोहम्मद सिध्दीकी | येस बँक, वाशी | ००६२६१९००००४०९२ |
| ४. | मोहम्मद रिजवान मोहम्मद शाकोर कुरेशी | आय.सी.आय.सी.आय बँक, मालेगाव नाशिक | ६४२८०१००२०६६ |
| ५. | मोहम्मद रिजवान कुरशी मोहम्मद शाकोर कुरेशी | कोटक महिद्रा बँक, सोयगांव, नाशिक | ३५११८७६७५१ |
| ६. | मोहम्मद रिजवान कुरशी मोहम्मद शाकोर कुरेशी | इंडसइंड बॅक, मालेगांव, नाशिक | १०००८८१५९५९६ |
| ७. | मोहम्मद रिजवान कुरशी मोहम्मद शाकोर कुरेशी | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मालेगांव, नाशिक | ३७६००१२०७७ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनुप कुमार सिंह,**
शासनाचे प्रधान सचिव (विशेष).

**HOME DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 20th November, 2025.

Order

MAHARASHTRA PROTECTION OF INTEREST OF DEPOSITORS (IN FINANCIAL ESTABLISHMENTS) ACT, 1999.

No. MPID-0324/C.R.No.22/Pol-15.—Whereas, Juhi Maritime Cargo and Logistic Services, Register No.1610200310305185 Registered Address, Flat No.3, Plot No. 423/424, Sector 1, Ghansoli, Navi Mumbai, Thane- 400 701, Office Adress-Office No. 617, Areja Corner, 6th Floor, Plot No 71, Sector No.17, Vashi, Navi Mumbai (hereinafter referred to as "the said Financial Establishment") and its, Directors, Manager, Promoters, Partners and its Employees received deposits from depositors under the scheme to repay the deposits on maturity along with benefits promised thereof to the depositors ;

And whereas, offence has been registered against the said Financial Establishment and its Directors, Manager, Promoters, Partners and its Employees at Vashi Police Station, Navi Mumbai vide Complaint Register No. 119/2020 under sections 406, 409, 420, 506 and 120 B of the Indian Penal Code (45 of 1860) and sections 3 and 4 of the Maharashtra Protection of Interest of Depositors (in Financial Establishments) Act, 1999 (Mah. XVI of 2000), that they have collected the deposits and have failed to repay the deposits after maturity ;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that the said Financial Establishment and its Directors, Manager, Promoters, Partners and its Employees have failed to repay the deposits on demand by the depositors and the said Financial Establishment are not likely to repay the deposits to the depositors ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to attach the monies and other properties believed to have been acquired by the said Financial Establishment and its Directors, Manager, Promoters, Partners and its Employees or any other person either in their own name or in the name of any other person from out of the deposits collected by the said Financial Establishment, in order to protect the interest of the depositors of the said Financial Establishment and to appoint Sub-Divisional Magistrate Thane, District Thane as the Competent Authority to exercise control over the Amounts and other properties attached ;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 and sub-section (*1*) of section 5 of the Maharashtra Protection of Interest of Depositors (in Financial Establishments) Act, 1999 (Mah. XVI of 2000), the Government of Maharashtra hereby, –

(*a*) attaches the monies and other properties in the name of Juhi Maritime Cargo and Logistics Services and its Directors, Manager, Promoters, Partners and its Employees or any other person, as specified in the Schedule appended hereto ; and

(*b*) appoints the Sub-Divisional Magistrate, Thane, District Thane to be the Competent Authority to exercise control over the monies and other properties attached.

*Schedule*

The list of monies and other properties of the Juhi Maritime Cargo and Logistic Services, and its Directors, Manager, Promoters, Partners and its Employees or any other person to be attached are as follows, namely :—

**(A) Immovable Properties Details :—**

| Sr. No. | Village/ Taluka/ District | Property Details | Name of Owner |
|---|---|---|---|
| 1 | Vashi,<br>New Mumbai, | Servey No.5/148, Room No. A/3, Ground Floor, Building No. 3, Noor Society,Plot No.18, Sector No. 9 A, Area 60.85 Sq.meter<br>Dast No.TNN 3/12292/2018<br>Date 1st September 2018 | 1. Talah Shafi Murshedkar<br>2. Munnaja Talah Murshedkar<br>3. Ishak Akber Haveliwala |
| 2 | Vashi,<br>New Mumbai, | Servey No. 5/197 Office No. 1103, 11th Floor, Natural Gum Premices Society, Plot No.2, Sector 19 D, Area 78.9298 Sq.meter<br>Dast No.TNN 8/3831/2018<br>Date 31st March 2018 | 1 Talah Shafi Murshedkar<br>2 Vijay Narayan Kanse<br>3 Sheikh Adil Abdul Gani<br>4 Sheikh Safiya Adil<br>5 Sheikh Mohammad Siddiki |
| 3 | Malegao,<br>Nashik | Servey No. 85/2 , Plot No.26, 27, Sana Enclave Part 3, Ground Floor, Unit 1, Area 60.22 Sq.meter<br>Dast No MLN.3/3140/2019<br>Date 6th July 2019 | 1. Mohammed Rizwan Mohammmed Shakor Qureshi<br>2. Shakina Banu Mohd Rizwan Qureshi |

**(B) Bank Accounts Details :–**

| Sr. No. | Name of Account Holder | Name of Bank | Account No. |
|---|---|---|---|
| 1. | Juhi Maritime Cargo and Logistic Services | I.C.I.C.I. Bank, Vashi | 015105013572 |
| 2. | Juhi Maritime Cargo and Logistic Services | Yes Bank, Vashi | 00626190004032 |
| 3. | Shaikh Mohammed Siddique | Yes Bank,Vashi | 006261900004092 |
| 4. | Mohhamad Rizwan Mohhamad Shakur Qureshi | I.C.I.C.I. Bank, Malegaon, Nashik | 642801002066 |
| 5. | Mohhamad Rizwan Mohhamad Shakur Qureshi | Kotak Mahindra Bank, Soygaon, Nashik | 3511876751 |
| 6. | Mohhamad Rizwan Mohhamad Shakur Qureshi | Induslnd Bank, Malegaon, Nashik | 100088159596 |
| 7. | Mohhamad Rizwan Mohhamad Shakur Qureshi | Central Bank of India, Malegaon, Nashik | 3760012077 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANUP KUMAR SINGH
Principal Secretary (Special) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.